# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १३७** **दिनांक २७/०५/२०२१**

## घरफोडी करणा-या दोन आरोपीतांना अटक करून त्यांचेकडून सात गुन्हे उघडकीस तुळींज पोलीस स्टेशनची कारवाई

मिरा-भईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील तुळींज पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे सौ. कांचन भिमराज जैन वय ४८ वर्षे, व्यवसाय कपडयाचे दुकान रा. रुम नंबर ११०१, इ.विंग साईक्रीसटल डी मार्ट जवळ फायरब्रिगेड, आचोळे नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर यांनी तक्रार दिली की, दिनांक १२/०५/२०२१ रोजीचे १०.०० वाजता ते दिनांक १९/०५/२०२१ रोजीचे दुपारी १२.०० वाजताचे सुमारास भवानी साडी सेन्टर शॉप नंबर १, रॉलय अर्पा, अल्कापुरी कैलाशदर्शन बिल्डींग नालासोपरा पुर्व दरम्यान त्यांच्या बंद दुकानाचे शटर तोडून कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानातून एकूण ४१,०००/- रुपये किमतीचे नविन रेडीमेड कपडे चोरी केले बाबत तक्रार दिल्याने तुळींज पोलीस ठाणे येथे दिनांक २०/०५/२०२१ रोजी गुन्हा रजि नं. I ६४४/२०२१ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टिने तुळींज पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्वरीत घटनास्थळाची पाहणी करुन गुप्त बातमीदारांना माहीती देऊन वेगवेगळया माध्यमातुन तपास चालु केला.मिळालेल्या गुप्त बातमीवरुन दिनांक २०/०५/२०२१ रोजी दोन आरोपीत १) मंगल गोपी बंजारा,वय-२८ वर्षे, धंदा-बेकार, रा.रुम नं १३ न्यु महादेव चाळ अलकापुरी नालासोपारा पुर्व ता. वसई जि पालघर २) विकास मनोहर शिंदे,वय-३६ वर्षे, धंदा- वेटर, रा.रुम नं २०६ लक्ष्मी निवास अपार्टमेंन्ट अलकापुरी नालासोपारा पुर्व ता.वसई जि पालघर यांना नालासोपारा पुर्व येथे गुन्हयातील चोरीस गेलेला १३,८००/- रु किंमतीच्या मुददेमालासह ताब्यात घेउन अटक केली असता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे कबुली देउन त्यांचे कडून गुन्हयातील एकूण १,७१,७९९/- रुपये किंमतीचा चोरी केलेला माल हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क. | गुन्हा रजि.नंबर कलम |
|---|---|
| १) | गु.रजि.क्र. ६४४/२०२१ भा.द.वि.स. कलम ३८०,४५७,४५७ प्रमाणे |
| २) | गु.रजि.क्र. I १४४/२०२१ भा.द.वि.स कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ३) | गु.रजि.क्र.I ९०/२०२१ भादविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| ४) | गु.रजि.क्र.I ११६७/२०२० भा.द.वि.स. कलम ३८० प्रमाणे |
| ५) | गु.रजि.क्र.I ६९/२०२१ भा. दं. वि. सं. कलम ४५४,४५७, ३८० प्रमाणे |
| ६) | गु.रजि.क्र. I ४७५/२०२१ भादविस कलम ३८० प्रमाणे |
| ७) | गु.रजि.क्र. I १०८/२०२१ भा.द.वि.स. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पो.उप आयुक्त परि.मंडळ -२, श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र कांबळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, सपोनी संदेश पालांडे, मिथुन म्हात्रे, पो.उपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहापोउपनि बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, अनिल शिंदे, पो.ना. सावदेकर, आनंद मोरे, शेखर पवार, पो.शि. योगेश नागरे, सुखराम गडाख, शशीकांत पोटे, विनायक राऊत, यांनी केलेली आहे.